
# भारतीय विचारवंत



संपादक

डॉ. नीलम छंगाणी    डॉ. नितीन चौधरी

भारतीय विचारवंत

डॉ. नीलम छंगाणी / डॉ. नितीन चौधरी

अजिंक्य प्रकाशन

WhatsApp : 8007143527

E-mail : ajinkyapublication@gmail.com

Website : www.ajinkyapublication.com

**भारतीय विचारवंत : डॉ. नीलम छंगाणी, डॉ. नितीन चौधरी**
**प्रकाशक :**
ॲड. कु. जे. व्हि. भगत
अजिंक्य प्रकाशन
भिमनगर, वापटा पो. कुपटा
ता. मानोरा जि. वाशिम
**संपर्क :** ९६०४४०२०५३
WhatsApp : 8007143527
Website : www.ajinkyapublication.com
E-mail : ajinkyapublication@gmail.com

**ISBN :978-93-90532-20-9**

© लेखकाधिन
**प्रथम आवृती :** जानेवारी २०२१
**अक्षर जुळवणी :** अजिंक्य प्रिंटीग्स् ॲण्ड कॉम्प्यूटर्स
**मुखपृष्ठ :** अरविंद मनवर
**मुद्रक :** अजिंक्य एन्टरप्राईजेस, वाशीम
**प्रमुख विक्रेता:** अजिंक्य पुस्तकालय, वाशिम
**संपर्क :** ८००७१४३५२७ / ९६०४४०२०५३
**किंमत : रु.४५० फक्त**

(या पुस्तकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.)

| | | |
|---|---|---|
| १६. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सक्षमीकरण / डॉ. विद्या खंडारे | ८५ |
| १७. | महात्मा गांधी यांचे ग्रामविषयक विचार / प्रा. आर. बी. काळे, प्रा. जी. टी. मोकासरे | ८८ |
| १८. | रविंद्रनाथ टागोर (इ.स.१८६१ ते १९४१) / डॉ. के.जी. वाकोडे | ९१ |
| १९. | राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्ये / डॉ. किशन बाभुळगावकर | ९९ |
| २०. | संगीताच्या विकास प्रक्रीयेत तंत्रज्ञानाचे योगदान / प्रा. विद्या गावंडे | १०४ |
| २१. | संत तुकडोजी महाराज एक कृतिशील विचारवंत / डॉ. सुधीर भगत | १०६ |
| २२. | लोकमान्य टिळकांच्या आर्थिक विचारांची प्रस्तुतता : स्वदेशीच्या संदर्भात / श्री. संतोष भावार्थे | १११ |
| २३. | ना.धो. महानोर यांच्या काव्यातील शेतजीवन / प्रा. रामचंद्र पस्तापूरे | ११५ |
| २४. | भास्कर चंदनशिव यांच्या कथा आणि समाजजिवन / प्रा. प्रशांत कांबळे | ११८ |
| २५. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही प्रशासन / डॉ. नरसिंग कुडकेकर | १२१ |
| २६. | महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार / डॉ. प्रेमसिंग जाधव | १२५ |
| २७. | महात्मा गांधीचा शिक्षण विषयक दृष्टीकोन / प्रा. दिगंबरकुमार लांडगे | १२९ |
| २८. | डॉ. राधाकमल मुखर्जी – एक समाजशास्त्रज्ञ / प्रा. स्मिता देवर | १३२ |
| २९. | एमील दुरखिमचे आत्महत्या संबंधी सामाजिक विचार / डॉ. अनिल ठाकरे | १३९ |
| ३०. | १९६० नंतरची दलित कथा : एक आकलन / | |

# 'महात्मा गांधी यांचे ग्रामविषयक विचार'

प्रा.आर.बी.काळे
समाजशास्त्र विभाग
र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई श्री.

प्रा.जी.टी.मोकासरे
समाजशास्त्र विभाग
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव

**प्रस्तावना :**

महात्मा गांधी हे सामाजिक, राजकीय आणि धार्मिक अभ्यासक होते. १९१५ मध्ये महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आल्यानंतर भारतातील परिस्थिती माहित करून घेण्यासाठी त्यांनी संपूर्ण देशभर भ्रमण केले. भारतातील संस्कृती आणि समस्या जाणून घेण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला. स्वातंत्र्य ही प्रथमलक्ष असल्याने आणि बहुसंख्य जनता साक्षर नसल्याने महात्मा गांधींनी आर्थिक विकासापेक्षा उच्च सामाजिक आणि वैयक्तिक मूल्य स्थापित करण्यावर आपल्या विचारात भर दिल्याच दिसून येते. मात्र तरीही या मूल्यावर आधारित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी काही कालातीत विचार स्पष्टपणे मांडले आहेत. महात्मा गांधी यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वदेशी आणि ग्रामस्वराज्यासाठी संकल्पना रुजवायला सुरुवात केली होती. ग्रामस्वराज्यासाठीच त्यांनी 'खेड्याकडे चला' हा महत्त्वाचा संदेश होता.

**उद्देशः**

१. महात्मा गांधी यांचा ग्रामीण जीवनविषयक विचारांचा अभ्यास करणे.

**तथ्यसंकलनः**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

"महात्मा गांधीच्या विचारानुसार स्वराज्याचा अर्थ स्व-राज्य आणि आत्मसंयम आहे. अधिकाऱ्यांच्या दुरुपयोग याला विरोध करण्याची क्षमता आल्यानंतरच अशा प्रकारची स्वराज्य येऊ शकते असे गांधीजींचे मत होते. खेड्यांमध्ये स्वराज्याचा अर्थ व्यापक आहे कारण भारताचा आत्मा खेड्यामध्ये आहे अशी गांधीजींची धारणा होती. खेडे हेच गांधीच्या विचार केंद्र होती. यामध्ये भारतीय सामाजिक आणि राजकीय संस्थांचाही समावेश आहे." गांधीजींच्या संकल्पनेतील ग्रामस्वराज्य याचा शाब्दिक अर्थ गावाचे स्वतःचे शासन असा होतो यामध्ये प्रत्येक गाव पूर्णपणे प्रजासत्ताक आणि स्वतःच्या गरजांसाठी इतरांवर अवलंबून असणे अपेक्षित होती. त्यामुळेच गांधी यांनी खेड्याच्या स्वावलंबनावर जोर दिलेला आहे. महात्मा गांधींच्यानुसार 'भारतातील आदर्श ग्रामची रचना अशा रीतीने झाली पाहिजे की ज्यामध्ये सार्वजनिक स्वच्छता पूर्णपणे नांदली पाहिजे. गावात अस्वच्छता असता कामा नये. सर्वांच्या गरजा भागतील इतक्या व सर्वांना खुल्या अशा विहिरी असल्या पाहिजेत. सर्वांसाठी प्रार्थनागृह, सार्वजनिक सभेसाठी जागा, सार्वजनिक गुर चरण्यासाठी कुरण, एक सहकारी दुग्ध संस्था, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची शाळा पाहिजे.

गावातील तंटे मिटविण्यासाठी पंचायत पाहिजेत अशाप्रकारे गांधीजींची आदर्श खेडेगावाची कल्पना आहे. ' खेडे हे स्वयंपूर्ण स्वायत्त राज्य असावे अशी धारणा होती आज मात्र खेड्यांची अवस्था अत्यंत हलाखीची झालेली आहे. नेहमीचा दुष्काळ किंवा अवेळी येणारे संकट यामुळे आजचा खेड्यातील शेतकरी कर्जबाजारी झालेला आहे. ग्रामीण जीवनाचा मुख्य आधार शेती व्यवसाय आता मोडकळीस आलेला आहे. त्यामुळे शेतकरी हा दुष्टचक्रात अडकला असून त्यातून बाहेर पडण्यासाठी तो आत्महत्येचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात करत आहेत. अशा पद्धतीने खेड्यातील शेतकऱ्यांची दुर्दशा झाली आहे.

खेडेगाव आर्थिक बाबतीत स्वावलंबी असावे खेड्यांनी शहरावर अवलंबून राहू नये मूलभूत गरजा गावातच पूर्ण होण्यासाठी वस्तूंचे उत्पादन गावातच झाले पाहिजे. खेड्यात उत्पादन वाढीबरोबर उत्पादनाचे योग्य वितरण झाले पाहिजे. खेड्यातील अर्थव्यवस्थेची शेती हाच मुख्य आधार आहे परंतु ग्रामीण भागातील आर्थिक जीवन अत्यंत विस्कळीत झालेले आहे. दररोज कोणत्या ना कोणत्या वर्तमानपत्रातून कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या अशा बातम्या येतात शेतकऱ्यांच्या आत्महत्या एक सर्वसामान्य बाब झाली आहे. ग्रामीण भागाची घसरलेली आर्थिक घडी व्यवस्थित बसवायची असेल तर आपणास महात्मा गांधीच्या सांगितलेल्या ग्रामीण आर्थिक विचार अंगीकारावा लागेल. महात्मा गांधी यांच्या दृष्टीकोनातून विकासाचा केंद्रबिंदू हे खेडे आहे. म्हणून गांधीजी म्हणतात देशाच्या विकासातील शेवटचा भाग म्हणजे खेडे आहे. त्याला अगोदर विकासाच्या प्रक्रियेत आणले पाहिजेत. ही खेडी स्वयंपूर्ण झाली पाहिजेत.

भारतातील प्रत्येक खेड्यात सांडपाण्याची व्यवस्था पिण्यासाठी स्वच्छ पाणी, खादी, ग्रामउद्योगांना चालना दिली पाहिजे. प्रत्येक खेड्यात धर्मशाळा, नाट्यग्रह, दवाखाने, शाळा असावी. प्रत्येक खेड्यातील कृषी व्यवसायात प्रगती घडवून आणून उत्पादन विक्रीसाठी स्थानिक बाजारपेठ उपलब्ध असणे आवश्यक आहे. यापद्धतीने खेडे असली पाहिजेत याविषयी मांडणी केलेली दिसून येते.

महात्मा गांधी यांनी भारतीय अर्थव्यवस्था सक्षम होण्यासाठी 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला कारण आज मोठी शहरे प्रचंड प्रमाणात वाढूनही तेथील रोजगारी, गुन्हेगारी व अनेक समस्यांचा प्रश्न आजही सुटलेला नाही. खेडे हे भारतीय अर्थव्यवस्थेचा आत्मा म्हणायला हरकत नाही. देशातील बहुसंख्य जनता आजही प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून आहेत. गांधीजींच्या मते देशाची आर्थिक प्रगती ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून असते. म्हणून त्यांनी ग्रामीण कृषी उत्पादन त्यावरील गुंतवणूक व त्यातून होणारी रोजगार निर्मिती यावर भर दिलेला होता. प्रत्येक गाव जर स्वयंपूर्ण झाले तर देशाचा आर्थिक विकास साधणे शक्य होईल.

सद्यस्थितीत जगभर कोरोना या आजारामुळे संपूर्ण जग भयभीत आहेत. त्यामध्ये भारत देशसुद्धा अपवाद नाही. या कोरोना महामारीमुळे लॉकडाऊन केल्यामुळे देशातील सर्वजनता संकटात सापडले आहेत. या लॉकडाऊनमुळे लोकांच्या नोकरी, रोजगार गेल्यामुळे त्यांच्यासमोर अनेक

समस्या निर्माण झाले आहेत. त्यामुळे शहरातून लोक स्थलांतरित होऊन खेड्यामध्ये स्थिर होऊ पाहत आहे.

ज्यांनी कधीही खेड्यात राहण्याचा विचार केला नव्हता अशा लोकांनाही आता शहरापेक्षा खेडेगाव सुरक्षित वाटू लागली. परंतु खेड्याची आर्थिक स्थिती विस्कटलेली असल्यामुळे खेड्यामध्येसुद्धा रोजगाराचा प्रश्न हा निर्माण झालेला आहे. म्हणून त्यासाठी श्रमप्रधान उद्योगाचे महत्व गांधीजींनी पटवून दिले होते. ग्रामीण जीवन स्वयंपूर्ण करायचे असेल तर शेती व्यवसायबरोबर इतर लहानलहान उद्योग ग्रामीण भागात स्थापन करण्यावर त्यांचा भर होता. परंतु अशाप्रकारचे ग्रामउद्योग नसल्यामुळे खेड्यामध्ये सुद्धा अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे आज महात्मा गांधीजींच्या विचारांची व कृतीची आवश्यकता आहेत. त्यादृष्टीने विचार आणि कृती केली तर खेडीही स्वयंपूर्ण बनतील. महात्मा गांधी यांनी जी ग्राम स्वराज्याची संकल्पना साकारलेली होती ती प्रत्यक्षात उतरेल.

**सारांशः**

भारताला आज विकसित राष्ट्राच्या पंगतीत बसायचे असेल तर महात्मा गांधी यांनी सांगितलेल्या विचारांकडे डोळेझाक करून चालणार नाही. ज्यापद्धतीने स्मार्ट शहरे संकल्पना निर्माण झालेली आहे. त्याच पद्धतीने स्मार्ट खेडे यापद्धतीने खेड्यांचा पायाभूत सुविधांची उपलब्धता करून खेड्यांना मुख्य प्रवाहात आणले तरच देशाचा विकास होणे शक्य आहे. म्हणून देशाला आजही महात्मा गांधी यांच्या आदर्श ग्रामविचारांची आवश्यकता आहे.

**संदर्भः**

१. जाधव, श्रीराम, गांधीजी आणि सामाजिक समता, महात्मा गांधी अध्यासन केंद्र, औरंगाबाद, २००९.

२. गांधी. मो. क, पंचायतराज, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद.

३.बी. आर. नंदा, महात्मा गांधी एक जीवनी, सस्ता साहित्यमंडळ प्रकाशन, नई दिल्ली, २०१९.

४. हरीशकुमार, सामाजिक और राजनीतिक परिवर्तन, अर्जुन पब्लिकेशन, नई दिल्ली, २००९.